بِسْمِ اللّٰہِ الرَّحْمٰنِ الرَّحِیْمِ    نَحْمَدُہٗ وَنُصَلِّیْ عَلٰی رَسُوْلِہِ الْکَرِیْمِ    وَعَلٰی عَبْدِہِ الْمَسِیْحِ الْمَوْعُوْد

لَآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوْلُ اللّٰہِ

دفتر مجلس انصار اللہ بھارت

Office Of The Majlis Ansarullah Bharat

Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in    محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# धर्मनिष्ठा आणि प्रामाणिकपणेचे मानक बदरी सोबतींच्या महत्त्वपूर्ण घटनांचा उल्लेख प्रतिकूल परिस्थिती पाहता पाकिस्तान, बुर्किना फासो आणि अल्जेरिया येथे राहणाऱ्या अहमदींसाठी प्रार्थना आणि अनुदान करण्याची घोषणा.

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक २५ फेब्रुवारी २०२३, मशिद मुबारक, टिलफर्ड,

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔
بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔ اِيَّاكَ نَعْبُدُ وَاِيَّاكَ نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔ صِرَاطَ الَّذِيْنَ اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔

तशह्हूद तआवुज आणि सुरह फातिहा च्या पठनानंतर हुजूर अनवर म्हणाले:

यापूर्वी उल्लेख केलेल्या बदरी सोबतींच्या संदर्भात काही गोष्टींचा उल्लेख करावयाचा राहिला होता ज्यांचे वर्णन मी करत होतो. आज मी याबद्दल काहीं प्रसंग प्रस्तूत करेन ही बदरी सोबतींच्या प्रसंगांची शेवटची मालिका आहे.

हजरत अमीर बिन रबीआह यांच्याबद्दल असे लिहिले आहे की त्यांच्या वडिलांचे नाव रबीआह बिन काब बिन मलिक बिन रबीआह होते. त्यांच्याकडून काही कथने मिळतात. अब्दुल्लाह बिन आमीर रबीआह यांची आई हजरत उम्मे अब्दुल्लाह लैला बिंत अबू हस्माह सांगतात की आम्ही एबिसिनियाला जाणार होतो आणि आमिर बिन रबीआह काही कामानिमित्त कुठेतरी गेले होते तेव्हा हजरत उमर, जे अजूनही इस्लामचे इन्कारी होते, तेथे आले. त्यांनी आम्हाला विचारले की काय तुम्ही जाणार आहोत?मी म्हणालो हो! अल्लाहची शपथ, आम्ही अल्लाहच्या भूमीत प्रवास करू जोपर्यंत अल्लाह आमच्यासाठी जागा समृद्ध करत नाही(राहण्यायोग्य शांतीमयी ठिकाण). तुम्ही लोकांनी आम्हाला खूप त्रास दिला आणि आम्हांवर अवैध अत्याचार केला. हजरत उमर म्हणाले की अल्लाह तुमचा पर्यवेक्षक असो! ती म्हणते की, त्यादिवशी हजरत उमरच्या आवाजात मला ते दुःख दिसले, जे मी याआधी कधीच पाहिले नव्हते. आमच्या स्थलांतराने त्यांना दुःख झाले होते. हजरत आमिर परत आल्यावर मी त्यांना म्हणाले, ‘‘तुम्ही उमर ची परिस्थिती पाहिली आहे का?’’ हजरत आमीरने उत्तर दिले, ‘‘त्यांनी मुस्लिम व्हावे अशी तुमची इच्छा आहे का?’’ तेव्हा ते म्हणाले की उमर चा गाढव मुस्लिम होऊ शकतो पण ती व्यक्ती इस्लाम धर्म स्वीकारू शकत नाही. हजरत लैला सांगतात की, हजरत उमरचा इस्लामला तीव्र विरोध आणि त्यांच्या कडकस्वाभामुळे निर्माण झालेल्या निराशेने अमीरने हे बोलले होते.

हजरत अब्दुल्लाह बिन आमीर सांगतात की त्यांचे वडील हजरत अमीर बिन रबीआह म्हणाले की जेव्हा पवित्र प्रेषित (स.) आम्हाला एखाद्या प्रदेशात पाठवत असत तेव्हा आमच्याकडे फक्त खजूरांची पिशवी असायची. लष्करचा अमीर आमच्यामध्ये मूठभर खजूर वाटून देत असे. हळुहळू ते संपत जाई, मग एक-एक व्यक्तिला एक खजूर मिळत असे. अब्दुल्लाह सांगतात की, मी माझ्या

वडिलांना विचारले की एक खजूर तुमच्यासाठी काय किंमतीचे असेल (ते पुरेसे नाही ना)? ते म्हणाले की असे म्हणू नका कारण त्याचे महत्त्व आम्हाला तेव्हा कळते जेव्हा तेही मिळत नसे.

हजरत उमर (र.ज.) यांनी त्यांच्या खिलाफत काळात खैबर परिसरातून ज्यूंना हुसकावून लावले तेव्हा ज्या लोकांदरम्यान वादी अल कुराची जमीन वाटप करण्यात आली त्यामध्ये हजरत आमीर बिन रबीआह (र.ज.) देखील सामील होते. हजरत उमर जेव्हा जाबियाला गेले तेव्हा हजरत आमीर त्यांच्यासोबत होते. एका कथनेनुसार हजरत उमरचा ध्वज हजरत आमीर यांच्याकडे होता. हजरत आमीर च्या मरणतिथीबद्दल इतिहासात असहमती पहावयास मिळते; परंतु अल्लामा इब्ने असाकर यांचे ३२ हिजरीचे कथन अधिक योग्य वाटते. त्यांच्या मृत्यूबाबत एक कथन असेही आहे की हजरत उस्मान (र.ज.) यांच्या हौतात्म्यानंतर, ते आपल्या घरातून कधीच बाहेर पडले नाही आणि शेवटी त्यांच्या अत्यंसंस्कारावेळीच त्यांचा शरीर बाहेर काढण्यात आला.

हजरत अब्दुल्लाह बिन आमीर आपल्या वडिलांकडून सांगतात की, पवित्र पैगंबर (स.)च्या काळात, एका व्यक्तीने बनू फझारा येथील एका स्त्रीशी दोन बूट च्या हक्क मेहरावर विवाह केला. पवित्र प्रेषित (स.) यांनी या विवाहाचे औचित्य सिद्ध केले. त्यांच्या वडिलांकडून दुसऱ्या परंपरेत त्यांनी असे वर्णन केले आहे की त्यांनी अल्लाहचे पैगंबर (स.) यांना प्रवासात रात्री उंटाच्या पाठीवर नफल नमाज अदा करताना पाहिले आणि त्यांचा (स.) चेहरा त्याच बाजूला होता ज्यादिशेला उंट जात होता.

हजरत आमीर बिन रबीआह सांगतात की मी एका अंधाऱ्या रात्री पवित्र प्रेषित (स.) सोबत प्रवास करत होतो आणि आम्ही एका ठिकाणी उतरलो, तेव्हा एका माणसाने दगड गोळा केले आणि प्रार्थना करण्यासाठी जागा बनवली आणि नमाज अदा केली. सकाळी आम्हाला ज्ञात झाला की आम्ही किबलाच्या विरूद्ध तोंड करून नमाज अदा केली आहे. आम्ही पवित्र प्रेषित (स.) ला विचारले, तेव्हा अल्लाहने हा श्लोक प्रकट केला. وَلِلّٰهِ الْمَشْرِقُ وَالْمَغْرِبُ فَأَيْنَمَا تُوَلُّوا فَثَمَّ وَجْهُ اللّٰهِ अर्थात पूर्व आणि पश्चिम अल्लाहसाठीच आहे, म्हणून तुम्ही जिकडे तोंड वळवाल तिकडे तुम्हाला परमेश्वराची महिमा मिळेल. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, गैरसमजामुळे असे घडले असेल तर काही हरकत नाही. हुजूर अनवर यांनी स्पष्ट केले की असे देखील होऊ शकते की ही आयत त्यावेळी त्वरीत अवतरीत झाली नसून आधीच प्रकट झाली असेल आणि लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी पवित्र प्रेषित (स.) यांना ती आयत पठन करून त्यांचे गैरसमज दूर केले असेल.

हजरत आमीर बिन रबीआह सांगतात की, पवित्र प्रेषित (स.) म्हणाले, ''जो कोणी माझ्यावर एकदा दुरूद पाठवतो, अल्लाह त्याच्यावर दहा वेळा शांती पाठवतो. त्यामुळे आता कमी दुरूद पाठवायचा आहे की जास्त, हे तुमच्या हातात आहे.'' आणखी एका हदीस मध्ये असे सांगण्यात आले आहे की, जो कोणी माझ्यावर शांतीसाठी प्रार्थना करतो आणि जोपर्यंत तो या अवस्थेत राहतो तोपर्यंत देवदूत देखील त्याच्याशांतीसाठी प्रार्थना करत असतात. म्हणून आता व्यक्तिवर अवंलबून आहे की तो कोणता मार्ग निवडतो.

पुढचा उल्लेख हजरत हरम बिन मल्हान (र.ज.) चा आहे. हजरत मुस्लेह माऊद (र.ज) हे सोबतींयांच्या त्यागभावनेबद्दल सांगतात की, आम्हाला इतिहास वाचून कळते की, पवित्र पैगंबराचे सोबती अशा प्रकारे युद्धात जात असत की त्यांना माहीत होते की युद्धात शहीद होणे हे त्यांच्यासाठी आराम आणि आनंदाचा स्रोत आहे. त्यामुळे परमेश्वराच्या मार्गात मारले जाण्यातच त्यांना खरा दिलासा वाटला, अशा अनेक घटना साथीदारांच्या इतिहासात आढळतात. उदाहरणार्थ, ते हुफ्फाज

(संपूर्ण पवित्र कुरआन स्मरण करणारे) ज्यांना पवित्र प्रेषित (स) यांनी मध्य अरबातील एका समुदायाकडे प्रचारासाठी पाठवण्यात आले, त्यांच्यापैकी हरम बिन मल्हान (रा.) अमीर बिन तुफैल या अमीर जमातीच्या प्रमुखाकडे इस्लामचा संदेश घेऊन गेले आणि बाकीचे साथीदार मागे राहिले. सुरुवातीला आमीर बिन तुफैल आणि त्याच्या साथीदारांनी दांभिकपणे त्यांचे स्वागत केले, परंतु जेव्हा ते संतुष्ट होऊन बसले आणि उपदेश करू लागले, तेव्हा काहीं दुष्टखोर लोकांनी एका माणस-ाला इशारे दिले आणि इशारा मिळताच त्याने हराम इब्न मल्हानला मागून भाल्याने वार केला ज्यानंतर ते खाली पडले आणि खाली पडताच त्यांच्यामुखातून ही आवाज निघाली اللّٰہ اکبر فُزْتُ وَرَبِّ الْکَعْبَۃ अल्लाहू अकबर फुझतु वा रब्बील काबा म्हणाले. म्हणजेच काबाच्या परमेश्वराची शपथ मला माझे ध्येय प्राप्त झाले. मग या दुष्ट लोकांनी बाकीच्या साथीदारांना वेढा घातला आणि त्यांच्यावर हल्ले केले. या प्रसंगी हजरत अबू बकरच्या मुक्त केलेल्या गुलामाचा उल्लेख आमीर बिन फहिरा याच्याबद्दल आहे, किंबहुना त्यांचा वध करणारा जो नंतर मुस्लिम झाला होता, त्याने मुस्लिम होण्याचे कारण असे सांगितले की, जेव्हा मी आमीर बिन फहिराला शहीद केले तेव्हा त्याच्या तोंडून उत्स्फूर्तपणे शब्द बाहेर पडले. فزت واللہ अर्थात अल्लाहची शपथ मला ध्येयप्राप्त झाले. या घटनांवरून असे दिसून येते की सोबत्यांच्यासाठी मृत्यू हे दुःखापेक्षा आनंदाचे कारण होते.

पुढील उल्लेख हजरत साद बिन खुला यांचा आहे. आमिर बिन साद यांनी त्यांचे वडील साद बिन वक्कास यांच्याकडून वर्णन केले आहे की त्यांनी सांगितले की, हज्जतुल विदाच्या वेळी मी आजारी होतो आणि अल्लाहचे पैगंबर (स.) हे मला पहायला आले होते. आजारपणामुळे मृत्यूजवळ पोहोचलो. मी म्हणालो की तुम्ही माझी परिस्थिती पाहत आहेत. माझ्या मुलीशिवाय इतर कोणीही माझे वारस नाहीत. तेव्हा माझ्या विचारण्यावर पवित्र पैगंबर (स.) म्हणाले की तुझ्या मालमत्तेमधील तिसरा भाग अनुदान कर (त्यापेक्षा अधिक करणे उचित नाही). ते म्हणाले की वारसांना चांगल्या स्थितीत सोडणे त्यांना गरजेपुरते सोडण्यापेक्षा चांगले आहे. तुम्ही अल्लाहच्या मार्गात जे काही खर्च कराल, त्याचे तुम्हाला प्रतिफळ मिळेल, इतकेच नव्हे तर तुम्ही तुमच्या पत्नीच्या तोंडात घातलेला एक घासही बक्षीसेचा पात्र ठरेल. हजरत साद बिन खौला हे स्थलांतरानंतर मक्केत मरण पावले.

पुढील उल्लेख हजरत अबुल हैसम बिन अल-तिहान यांचा आहे. त्यांनी पवित्र पैगंबरला (स.) की, मला दीक्षा घेण्याची तीव्र इच्छा आहे तर कशाप्रकारे आपली दीक्षा घ्यावी? पवित्र पैगंबर म्हणाले हजरत मूसाच्या ज्यागोष्टीवर बनी इस्त्राईलने दीक्षा घेतली होती त्याच गोष्टीवर तुम्हीही दीक्षा घ्या. ते युद्धात दोन तलवारी लावत असे म्हणून त्यांना धु सैफीनैन (दोन तलवार वाला) असेही संबोधित केले जात असे. सफीनच्या युद्धात ते शहीद झाले.

त्यानंतर हजरत असीम बिन थाबीत यांचा उल्लेख आहे. इमाम राझी यांनी लिहिले आहे की उहूदच्या युद्धादरम्यान, पवित्र पैगंबर (स.)च्या जवळ असलेल्या लोकांमध्ये हजरत असीम बिन थाबीत यांचा समावेश होता.

पुढील उल्लेख हजरत सहल बिन हुनैफ (र.ज.) अन्सारी यांचा आहे. उहूदच्या युद्धात पैगंबराच्या जवळ असणाऱ्या लोकांमध्ये हजरत सहल बिन हुनैफ यांचाही उल्लेख आहे. हजरत उमैर बिन सईद (र.ज.) यांनी सांगितले की, हजरत अली (र.ज.) यांनी त्यांच्या नमाज ए जनाजा मध्ये पाच तकबीर पठण केले. लोक आश्चर्यचकित झाले, तेव्हा त्यांना सांगितले गेले की, सहल बिन

हुनैफ, हे बदर युद्धात लढणारे लोकांपैकी एक होते आणि बदर युद्धात सहभाग घेणाऱ्यांना इतरांवर श्रेष्ठता प्राप्त आहे. आणि हे पटवून देण्यासाठी मी असे केले.

त्यानंतर हजरत जब्बार इब्न सक्खर (र.ज.) चा उल्लेख आहे. पवित्र पैगंबर (स.) यांनी हजरत अली (र.ज.) यांना दीडशे साथीदारांसह बनू तै मधील फुल्स मूर्ती पाडण्यासाठी पाठवले. त्यांनी हजरत अली (र.ज.) यांना काळा झेंडा आणि एक छोटा पांढरा झेंडा दिला. हजरत अली (र.ज.) सकाळी अल हातीमवर हल्ला करून त्यांच्या मूर्ती उद्ध्वस्त केल्या. या मोहिममध्ये ध्वज हजरत जब्बार बिन खिझर (र.ज.) यांच्या हातात होता.

हुजूर अनवर म्हणाले की, मला ज्या साथीदारांचा उल्लेख करायचा होता तो संपला आहे आणि आता मी पाकिस्तानच्या अहमदींसाठी प्रार्थना करण्यासाठी सर्वांना उपदेश करतो. अल्लाहला प्रार्थना करा की अल्लाह सर्व अहमदींना सुरक्षित ठेवो आणि तिथल्या अधिकाऱ्यांना आणि शासनाला न्यायनिष्ठ पाऊले उचलण्यास सद्‌बुद्धी देवो. तसेच जे लोक नाहक्कपणे अत्याचार करत आहेत अल्लाह त्यांनाही त्यांचे उचित शिक्षा देवो. तसेच बुर्किनाफासो च्या अहमदींसाठीही प्रार्थना करा, तिथेही सध्या बिकट परिस्थिती आहे आणि जे अतिरेकी आहेत ते आताही अत्याचार करत आहेत. अल्लाह आणि पैगंबराच्या नावावर अत्याचार करत आहेत. तसेच अल्जेरियाच्या लोकांसाठी प्रार्थना करा, काही सरकारी अधिकारी किंवा न्यायालये देखील अहमदींवर चूकीच्या मार्गाने अत्याचार करत आहेत. अल्लाह सर्वांचे रक्षण करो. यावेळी विशेषतः प्रार्थना आणि अनुदानावर भर द्या. अल्लाह विरोधकांच्या अत्याचारापासून सर्वांचे रक्षण करो.

शेवटी हुजूर अनवर यांनी पाकिस्तानात १९ फेब्रुवारीला विरोधींच्या गोळींने शहीद झालेले शहीद मुकर्रम मुहम्मद रशीद साहिब, इब्न चौधरी बशारत अहमद साहिब आणि ६ फेब्रुवारी २०२३ ला तुर्कीमध्ये आलेल्या भूकंपात मृत्युमुखी पडलेल्या आई अमानी बसाम अजलावी साहेबा आणि त्यांचा मुलगा सलाह अब्दुल मुईन यासोबतच मा. मक्सूद अहमद मुनीब प्रचारक तुर्की यांची थोडक्यात माहिती दिली आणि प्रवचनानंतर नमाज ए जनाजा अदा करण्याची घोषणा केली.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ! نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ
اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ،
عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ
لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔